ISSN No. 2394-9996

Vol- I

# New Vision

Multi-disciplinary
Bi-Annual
Research Journal



**Special Issue for National conference on**

## "Impact of Bhakti Movement & Sufism on Society"

30th & 31st August 2016

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सामाजिक सांस्कृतिक कार्य | | | |
| १५) | भक्ती चळवळीचा समाजावरील प्रभाव - एक चिंतन | डॉ. प्रकाश फड | इतिहास | 81 |
| १६) | भक्ती चळवळीचा समाजावरील प्रभाव | डॉ. विजया साखरे | इतिहास | 84 |
| १७) | मध्ययुगातील भक्ती साहित्य आणि स्वरूप | प्रा. जाधवर बी.डी | इतिहास | 87 |
| १८) | भक्ती चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य | प्रा. गव्हाणे रमाकांत | इतिहास | 91 |
| १९) | सुफी संप्रदायाचे सामाजिक योगदान | डॉ. कांबळे एस.आर.<br>प्रा. धनवे ए.एस. | इतिहास | 96 |
| २०) | सुफी एक तात्विक संप्रदाय | प्रा. शिंदे अनिता | इतिहास | 102 |
| २१) | भक्ती चळवळ संत नामदेवाचे सामाजिक कार्य | डॉ. खोडेवाड देविदास | मराठी | 110 |
| २२) | संत तुकारामांनी जाणलेले शब्दाचे सामर्थ्य | प्रा. झांजे. बी.जे.<br>डॉ. राजेंद्र धाये. | इतिहास | 114 |
| २३) | भक्ती चळवळीचा समाजावरील प्रभाव | डॉ. लदाफ. एस.के. | इतिहास | 118 |
| २४) | संत तुकारामाचे सामाजिक तत्त्वज्ञान - एक अभ्यास | डॉ. गट्टी. जी.व्ही. | इतिहास | 121 |
| २५) | भक्ती चळवळीत संत तुकारामाचे योगदान | प्रा. मोहन काळकुटे | इतिहास | 125 |
| २६) | संत तुकारामाच्या वाङमयातील सामाजिक विचाराची एंतिहासिक मिमांसा | प्रा. डॉ. प्रकाश महाजन | इतिहास | 128 |
| २७) | भक्ती चळवळीचे सामाजिक जागृतीचे कार्य | प्रा. डॉ. मोरे डि.अे. | इतिहास | 133 |
| २८) | मुस्लीम संताचे भक्ती चळवळीतील योगदान | डॉ. रामचंद्र झाडे | मराठी | 139 |
| २९) | मराठवाड्यातील सूफी संताचे सांस्कृतिक कार्य | डॉ. प्रशांत साबळे | इतिहास | 147 |
| ३०) | महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे सामाजिक ऐक्यासाठीचे कार्य | प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत. | इतिहास | 158 |




Scanned with CamScanner

Multi Disciplinary Research Journal
New Vision
ISSN No.2394-9996

# महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे सामाजिक ऐक्यासाठीचे कार्य

प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत,
इतिहास विभाग प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड.

श्रध्दा आणि प्रेम यांचा मिलाप म्हणजे भक्ती किंवा स्नेहपूर्वक ध्यान म्हणजे भक्ती असे म्हटले जाते. भक्तांची किंवा संताची भक्ती ही ईश्वरावरचे प्रेम, भक्ती तसेच ईश्वरीप्रसाद वा दैवीकृपा यावर आधारीत होती. भक्तीचा उदय वेदामध्येही आपणास आढळतो, भक्तीचे सगुण आणि निर्गूण ईश्वरभक्ती असे वर्ग होते, हिंदु मंदिरातील किर्तन, मूस्लीमांचे दगर्यातील कव्वाली तर शिखांच्या गुरूद्वारामधील गूरूबाणी हे भक्तीचे विविध माध्यम होते. भारतातील चळवळ ही मध्ययुगीन भारतीय इतिहासातील समाज सुधारणा विषयक कार्य करणारी खऱ्या अर्थाने एक कार्यशाळा होती. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशामध्ये हि चळवळ रूजत गेली. भक्ती चळवळीमध्ये सर्व स्तरातील लोक सहभागी झालेले होते. इश्वरप्रेम, माणूसकी, भूतदया, करूणा याची शिकवण देणारी होती. जातीभेद, धर्मभेद पंथभेद, राष्ट्रीय एकात्मता हिंदु, मुस्लीम ऐक्य साधणारी ती एक कार्यशाळा होती. खऱ्या अर्थाने भक्ती चळवळीने समाजाला एकसंघ बनवण्यासाठी प्रयत्न केला. भक्ती आंदोलन हे मध्ययुगीन काळामध्ये उदयास आले व या आंदोलनाने समाज सुधारनेवर मोठ्या प्रमानात भर दिलेला आहे. या भक्ती आंदोलनामध्ये वेगवेगळ्या संताचा समावेश होतो. भक्ती आंदोलनामध्ये नाम आणि नामस्मरण हया परमार्थातील फार महत्वाच्या गोष्टी आहेत. संपुर्ण भारतात भक्तीचा प्रचार आणि प्रसार भक्ती आंदोलनाने केला. त्यांनी संपुर्ण भारताला ईश्वर भक्तीचा प्रचार आणि प्रसार भक्ती आंदोलनाने केला. त्यांनी संपुर्ण भारताला ईश्वर भक्तीची नांदी लावली. तसेच ईश्वर भक्तीच्या माध्यमातून समाजातील दोष दुर करण्याचा प्रयत्न केला. आठशे वर्षापुर्वी संपूर्ण भारतभ्रमण करून भारतीय जनतेच्या सुखादु:खाशी समरस होणारे, त्यांच्या उध्दारासाठी अहोरात्र तळमळणारे, त्यांच्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे संत या आंदोलनात होते. त्याच प्रमाने त्यांनी समाजामध्ये वेगवेगळ्या सुधारना घडवुन आणल्या व समाजाला वाट दाखवण्याचे कार्य या भक्ती आंदोलनातील संतानी केले आहे.

भक्ती आंदोलनाचा आरंभ भारतामध्ये मध्ययूगीन काळाच्या पूर्वार्धात दक्षिण भारतात झाला, दक्षीणेत उगम पावलेली ही चळवळ तिचा प्रवास उत्तरोत्तर उत्तरेकडे झाल्याचे दिसते, दक्षिणेत भक्ती चळवळीचा प्रसार अलवार आणि नयनार संतांच्या माध्यमातुन झाला होता. हिंदु समाजात जातीभेद, अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात होती. हिंदु धर्माच्या रूढी आणि परंपरेमुळे तत्कालीन ब्राम्हण बाकी सर्वाना शुद्रचं समजत होते. ज्याप्रमाणे अस्पृश्याना जातीयतेचे चटके सहन करावे लागत होते. त्यांना जी अवहेलना सहन करावी लागत होती; ती अवहेलना सर्वच संताना सहन करावी लागली. त्यामुळे त्यांनी अठरापगड जातीतील संत मंडळींना एकत्रीत करूण त्यांना भक्ती मार्गाची नवी दिशा दाखविली. संतानी अठरा पगड जातीतील संतांना पुढे आणले. त्यांच्यासाठी चंद्रभागेच्या विशाल



Scanned with CamScanner

ाळवंटात, एक आगळे-वेगळे भक्तीपीठ निर्माण करून तेथे भागवत धर्माची पताका उभारली. ती पताका म्हणजे समता, एकता व मानवतेचे प्रतिक आहे. भक्ती आंदोलन हे मध्ययुगीन काळामध्ये उदयास आले व या आंदोलनाने समाज सुधारनेवर मोठ्या प्रमानात भर दिलेला आहे. या भक्ती आंदोलना मध्ये वेगवेगळ्या संताचा समावेश होतो. भक्ती आंदोलनामध्ये नाम आणि नामस्मरण हया परमार्थातील फार महत्वाच्या गोष्टी आहेत. संपुर्ण भारतात भक्तीचा प्रचार आणि प्रसार भक्ती आंदोलनाने केला. त्यांनी संपुर्ण भारताला ईश्वर भक्तीची नांदी लावली.

भक्ति आंदोलनातील प्रमुख तीन प्रसारमाध्यमे प्रचलित होती. ती लोकपीठ, व्यासपीठ आणि रंगपीठ ही आहेत. पुराण-कथा-श्रवण यांच्याकरिता सिद्ध असलेल्या व्यासपीठाचा उपयोग पुराण, आख्यानात्मक साहित्य, दीर्घकथात्मक काव्ये आणि श्रोतावक्ता-संवादात्मक ग्रंथ यांच्या प्रसारासाठी करून घेण्यात आलेला आहे. परमात्मा, जीव व जगत यांच्याकडे पाहण्याचा वारकरी संतांचा दृष्टीकोण, निरोगी, या तात्विक शुध्द दृष्टीचा होता. कर्मकांड विधी, यांना दूर सारून सर्वजन सुलभ नामभक्तीला आणि नितिमूल्यधिष्ठीत आचाराला वारकरी संतांनी प्रस्थापित केले. तळागाळातील समाज बांधवांना भक्ति प्रेमाने जवळ करीत त्यांना मंत्र देवून आत्मविश्वासाने पारमार्थिक विकासाच्या मार्गात आणले. स्त्री शूद्रादिकांना आत्म विकासाचा मार्ग खुला करून दिला. आचार, सुलभ धर्ममार्ग व स्वधर्म आणि स्वसंस्कृती यांचे संरक्षण करण्याची जाणिव व जागृती मध्ययुगीन वाङ्मयात निर्माण झालेली दिसते. म्हणूनच याकाळातील भक्तीप्रधान साहित्यात अध्यात्म प्रतिपादन आणि समाज प्रबोधन दोन्हीही आढळते.

जगातील एकूणच धर्माची शिकवण ही मानवतावादी आणी सहिष्णू आहे, हाच आधार भक्ती चळवळीलाही लागु पडतांना दिसतो, भक्ती ही जशी स्वेच्छीक भूमिका होती तसे त्याचे विवीध सामाजिक अंगही महत्वाचे ठरतात, भक्ती चळवळीतील संतांनी समाजाला समतेची, शांततेची, प्रेमाची, श्रध्देची शिकवण दिली. भारतीय सण-उत्सव हे व्यक्ती आणि समाजात एकजिनसीपणाचे नाते निर्माण करण्याचे, स्नेहभाव वाढविण्याचे प्रसंग घडवून आणतात, तसेच सृष्टीशी मानवाचे नाते दृढ करण्याचे विधी या सण उत्सवात असतात, असे असेल तरी मध्ययूगीन समाजात गूण्यागोविंदाचे वातावरण राहिले होते असे नव्हे, स्वार्थ, मत्सर, हेवेदावे प्रतिष्ठेच्या खोट्या संकल्पना, दांभीकता, अहंकार या मानवी प्रवृत्ती उसळून आल्या होत्या, असे घडले म्हणजे समाजात परस्परामध्ये तेढ निर्माण होते. जाती धर्माच्या नावाखाली मत्सराची आणि द्वेषाची बीजे रोवली जातात, श्रेष्ठ कनिष्ठतेची उतरंड रचली जाते आणी समाजात विषमतेची व दूहिची वाढ होते, या समाजात चातूर्वर्ण्य व्यवस्थेने दूफळी निर्माण झाली होती, या परिस्थीतीने समाज ग्रासला होता. शंकराचार्यांच्या तसेच रामानूजाचार्यांच्या पंडीती चर्चा सर्वसामान्यांना पचनी न पडणाऱ्या होत्या, या सर्व पार्श्वभूमिवर जनमनाला रूचेल भावेल, सर्व अंगानी परवडेल अशा पध्दतीच्या व स्थानीक भाषेतून खऱ्याखूऱ्या अध्यात्माची गरज ओळखून संत मंडळींनी भारतात प्रबोधनाचे मोठे कार्य केले.

**संदर्भसूची :**


१. डॉ. सुर्यकांत घुगरे - विरशैव व इतर धर्म आणि समाज-साधना बुक्स गडहिंग्लस - प्र.आ. १९९९
२. देशपांडे अ.न. - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ - व्हिनस प्रकाशन पूणे - प्र.आ.
३. डॉ. यू.म. पठाण, महानुभव साहित्य संशोधन खंड, १९७३, औरंगाबाद
४. सुहासिनी इर्लेकर, संत कवी आणि कवयित्रीएक अनुबंध, २००६ स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
५. डॉ. जयसिंगराव पवार व प्रा. मंजूश्री ज. पवार, `भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास`, अंधुरती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती जून २००६.





Scanned with CamScanner